पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०९५ दिनांक २६/०९/२०१९**

**चार वर्षाचा मुलागा त्याचे घराचे बाहेर खेळत असताना अचानक कोठेतरी निघून गेला असताना सदर मुलास आई-वडीलांचे ताब्यात दिले बाबत.**

दिनांक २४/०९/२०१९ रोजीदुपारी ०१:०० वा.चे सुमारास इसम मुक्तार महमद रज्जाक रहिण,वय २९,रा.सेवक चौक,येरवडा,पुणे यांनी पर्णकुटी पोलीसचौकीचे पो.उप.निरी.भुषण कोते, येरवडा पो.स्टे. यांना समक्ष येऊन कळविले की, त्यांचा मुलगा अरबाज मुक्तार रहिण, वय ४ वर्षे, रा. सदर हा सकाळी ११:०० वा.चे सुमारास घराचे बाहेर खेळत असताना अचानक कोठेतरी निघून गेला असल्याचे सांगितले. पो.उप.निरी.भुषण कोते यांनी त्यांचेकडून मुलाचा फोटो घेवून लागलीच स्वतः पो.हवा.४१२८ सुनिल जाधव, पो.ना.भुजबळ, पो.शि. ३८८६ सचिन जाधव, पो.शि. ७४१७ तेजस भोसले, पो.शि. १०५५४ विष्णू ठाकरे यांचेसह पर्णकुटी चौकीचे हद्दीत सदर मुलाचा शोध घेण्यास सुरूवात केली असताटकाही वेळानंतर सदरचा मुलगा अरबाज हा मच्छी मार्केट,साळवेनगर,येरवडा,पुणे येथे मिळून आला. सदर मुलास पो.उप.निरी. भुषण कोते यांनी त्याचे आई, वडीलाना पर्णकुटी चौकीस बोलावून घेऊन त्यांचा मुलगा अरबाज मुक्तार रहिण, वय-०४ वर्षे यास त्यांचे ताब्यात दिले. सदर मुलाचे वडील मुक्तार महमद रज्जाक रहिण, वय २९, रा. सेवक चौक, येरवडा, पुणे व आई मोमिनाखातुर रहिण, वय २८ वर्षे, रा. सदर यांनी मुलगा सुखरूप परत मिळालेबाबत पोलीसांचे आभार मानले आहेत.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडीलपो.उप.निरी.भुषण कोते, पो.हवा.४१२८ सुनिल जाधव, पो.ना.भुजबळ, पो.शि.३८८६ सचिन जाधव, पो.शि. ७४१७ तेजस भोसले, पो.शि.१०५५४ विष्णू ठाकरे यांनी हरविलेल्या चार वर्षाचे मुलाचा शोध घेवून त्याचे आई वडीलांचे ताब्यात देऊन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

